# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २५.१०.२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१३) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक २५ ऑक्टोबर २००५ रोजे स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.०० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०४) श्री. जगीरदार अजेजमुख्तार अहमद
(०५) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०६) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०७) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०८) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०९) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(१०) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(११) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१२) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१३) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : स.सदस्या सौ. लता दलाल यांनी अनेक वेळा मागिल बैठकीत निराला बाजर अतिक्रमण तसेच तापडीया रंगमंदिर संबधी व शहरातील झालेले इतर अतिक्रमणासंबधी माहिती देण्याची मागणी केलेली आहे. परंतु आतापर्यत माहिती देण्यात आलेली नाही. नेहमी पुढील बैठकीत माहिती देवू असे म्हटले जते. हे योग्य नाही. माहिती मिळत नसेल तर आजची बैठक आम्ही सर्व सदस्य होऊ देणार नाही असे सर्वाच्या वतीने नमूद करतो.

श्री. मिलींद दाभाडे : अधिकाऱ्यांनी केलेल्या चुकामुळे आपण नेहमी ताशेरे ओढतो. कार्यवाही करण्याचे नमूद करतो. परंतू एखादया अधिकाऱ्यांने चांगले काम केल्यास त्यांचे अभिनंदन सुध्दा झाले पाहिजे परवाच्या दिवशी मा. उपआयुक्त महसूल तसेच जकात अधिक्षक यांनी एका गोडावूनमध्ये तपासणी करून लाखो रूपयांचा कपडा विना जकात असलेला जप्त करून दंडात्मक कार्यवाही करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविले त्याबद्दल सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

श्री.मुजेब खान : आताच अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यापूर्वी अनेक अधिकाऱ्यांनी चांगले काम केलेले आहे अभिनंदन केलेले आहे, हे काही नवीन नाही. जकात विभागात गेल्या चार महिन्यापासून मोठया प्रमाणात भ्रष्टाचार चालू आहे. मा.आयुक्ताकडे बैठक झाली त्या बैठकीला मला बोलाविण्यात आलेले होते. मागिल एका

प्रकरणात उपआयुक्त यांचेकडे चौकशीसाठी असलेले प्रकरण मा.आयुक्त यांनी काढून मुख्य लेखापरीक्षक यांचेकडे  दिलेले आहे. अभिनंदन केले परंतु गोडावून मध्ये माल पकडला जतो. माल जकात नाक्यावरून आला असेल तेंव्हा तेथील कर्मचारी काय करीत होते. माल सोडला कसा, हा प्रश्न निर्माण होतो. आज्ही गोडाऊन मध्ये माल पडलेला आहे. जे चौकशी चालू आहे त्यावर पडदा टाकण्याचा हा प्रयत्न दिसतो. मी दिलेल्या प्रकरणाची केंव्हा  चौकशी चालू होणार आहे. २४ तारखेपर्यत चौकशी होणार होती.

मा.सभापती : आय.ए.एस अधिकारी श्री.विजय वाघमारे हे सध्या महानगरपालिकेच्या संदर्भात प्रशिक्षणार्थी सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून माहिती घेत आहेत. या सभागृहाचे कामकाज कशा पध्दतीने चालते याची माहिती त्यांना घ्यावयाची आहे. त्यांना सर्वाच्या वतीने सभागृहात बसण्याची परवानगी देण्यात येते.

(याच वेळी प्रशिक्षणार्थी सहाय्यक जिल्हाधिकारी मा.श्री.विजय वाघमारे हे सभागृहात आसन गृहन करतात.)

श्री.मुजेब खान : सर्वाच्या वतीने अभिनंदन करतो. या सभागृहाच्या कामकाज संबधीचा त्यांना फायदा होईल अशी अपेक्षा करतो. मागिल जकात प्रकरणाची चौकशी होत नाही तोपर्यत अधिकाऱ्याचे अभिनंदन करणे बरोबर नाही.

श्री.मिलींद दाभाडे : चोरी लपविण्यासाठी अभिनंदन केलेले नाही. जे अधिकारी चुकीचे काम करीत असतील त्यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे माझा पाठिंबा आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : मागिल अनेक बैठकीपासून जेष्ठ स.सदस्या सौ. लता दलाल यांनी ज्या संबधी कार्यवाही करण्याची मागणी केलेली होती. त्याचा खुलासा सविस्तर खुलासा होणे अपेक्षीत आहे. तसेच विवेकानंद महाविदयालयाच्या बाजूला जगा असून ती एका विश्वस्त संस्थेने विकसीत केलेली असून माझ्या माहिती प्रमाणे अद्याप त्यास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी आज्ही हॉटेल, दुकाने चालू आहेत. सर्व व्यवहार होत आहेत. त्याचाही खुलासा करावा.

सौ.लता दलाल : सर्वाना दीपावली तसेच ईद निमित्त शुभेच्छा देते. मागिल बैठकीत अनेक वेळा अतिक्रमणाच्या संदर्भात चर्चा झालेली आहे व मागिल १० वर्षापासून ज्या संबधी कार्यवाही करण्याची मागणी करते तरीही  कार्यवाही होत नाही म्हणून धरणे धरावे लागले. ही माझ्या आयुष्यातील पहिली घटना असेल. आठ दिवस झाले अद्याप माहिती दिलेली नाही. मग ते २०५९२ असेल किंवा तापडीया नाट्य मंदिर असेल, निराला बाजर असेल. जेथे बांधकाम झाले त्यास भोगवटा प्रमाण दिले किंवा नाही  कोणतीही माहिती दिलेली नाही. हे माझे दुर्दैव समजते. अनेक वेळा मागणी करूनही प्रशासन उत्तर देत नसेल तर योग्य नाही. आतापर्यत का कार्यवाही करण्यात आलेली नाही. केली नसेल तर का केलेली नाही, याचा खुलासा व्हावा. नसता खेदाने म्हणावे लागते की आजची सभा आम्ही होवू देणार नाही.

श्री.अजीजजगीरदार : क्रांतीचौक भागात महानगरपालिकेने लिजवर जगा दिलेली आहे. लीजची मुदत संपून ५० वर्ष झाली महानगरपालिकेने अद्याप जगा ताब्यात घेतलेली नाही. या कालावधीची रक्कम वसूल केलेली आहे का? केलेली नसेल तर का केलेली नाही व किती रक्कम वसूल करणार आहात. त्या लोकांनी त्याचे नावाचे पी.आर. कार्ड तयार केलेले आहे. असे होत असतांना प्रशासन काय काम करीत आहे

असा प्रश्न पडतो. याची मा.सभापती आपण खात्री करून घ्यावी. लाखो रूपये किंमतीची जगा दुसऱ्याच्या नावावर होते. असे सांगण्यात येते की जेपर्यंत जगा नावावर होत नाही तोपर्यंत कब्ज घेवू शकत नाही. या संदर्भात प्रशासनास काय अडचणी येत आहे. याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : स.सदस्य श्री.दाभाडे मिलींद यांनी अधिकाऱ्यानी चांगले काम केले म्हणून अभिनंदन केलेले आहे. तसेच जकात विभागाच्या संदर्भात स.सदस्य श्री.मुजीब खॉन यांनी ज्या पध्दतीने जकात विभागाचे काम होणे आवश्यक आहे ते होत नाही, ज्या बाबी त्यांनी प्रशासन व सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही करण्याच्या बाबतीत वरीष्ठांना सुचना दिलेल्या आहेत. स.सदस्यांचे मत प्रशासनाच्या विचाराधीन आहे. मा.आयुक्त चौकशी करतील तो अहवाल या सभागृहासमोर सादर होईल त्यावेळी चर्चा करता येईल. सुचना मांडत असतांना सर्वांना विनंती की सभागृहात धोरणात्मक निर्णय घेता येतील या दृष्टीने चर्चा करावी. कोणत्या पध्दतीची कामे केली पाहिजे आणि कोणत्या कामास प्राधान्य दिले पाहिजे, ही समिती नियोजन समिती आहे. जे बजेट ठेवलेले आहे ते खर्च कशा पध्दतीने खर्च करायचे त्या बाबतीत आपण धोरणात्मक विचार मांडले पाहिजे त्याची अंमलबाजवणी आपण करीत असतो. सर्वांना विनंती की आपला कामकाजचा अनुभव मोठा आहे. वैयक्तिक पातळीवर काही प्रश्न असतील ते डायरेक्ट अधिकाऱ्यांशी संपर्क साधून किंवा लेखी देवून माहिती मिळू शकते. वार्डातील काही कामे असतील ती तात्काळ मार्गी लागू शकतात. जे महत्वाचे व शहराशी निगडीत असे प्रश्न असतील त्या संबधी चर्चा करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी वेळ देणेसाठी सर्वानी सहकार्य करण्याची गरज आहे. या सभागृहात निराला बाजरच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेले आहे. निराला बाजर येथील जे रस्ता आहे जेथे शेड व अतिक्रमण मोठया प्रमाणात झालेले आहे त्या बाबतीत काही निर्णय घेतलेले आहेत का? सदर रस्ता रहदारीसाठी उपलब्ध आहे का? त्या रस्त्यावर किती कच्चे व पक्के बांधकाम झालेले आहे, याची माहिती द्यावी. आतापर्यंत किती लोकांवर कार्यवाही केलेली आहे याचा सविस्तर खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : निराला बाजर येथे रस्त्यावरील फुटपाथवर एकूण १४ अतिक्रमणे आहेत. त्या संदर्भात संबंधीतांना नोटीस तामिल करण्यात आलेली आहे आणि स्वत:हून हटवून घ्यावेत म्हणून सूचनाही दिलेल्या आहेत. तसेच त्या भागात असणाऱ्या हातगाडया, हॉटेल, टपऱ्या हटविण्याची कार्यवाही या विभागामार्फत वेळोवेळी करण्यात आलेली आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : जे जगा महानगरपालिकेच्या मालकीची आहे त्यांना नोटीस देण्याची गरज नाही. नेहमी हेच उत्तर मिळते. मकाईगेट जवळ आनंदनगर म्हणून भाग आहे तेथे महानगरपालिकेची जगा असून अतिक्रमण झालेले आहे. पायी चालता येत नाही अशी परीस्थिती आहे. कर्मचारी संख्या कमी असेल तर ते वाढविण्यात यावे परंतु अतिक्रमण हटविण्यात आले पाहिजे

श्री. रेणुकादास वैद्य : नोटीस द्यायची व मुदत संपली असे सांगायचे म्हणून महानगरपालिकेच्या प्रशासनाचे काम संपले आहे का?

सौ.लता दलाल : विवेकानंद महाविदयालय, तापडीया सर्कल तसेच निराला बाजर या ठिकाणी जी बांधकामे झालेली आहे त्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे का. कच्च्या स्वरूपाचे म्हणजेकोणत्या स्वरूपाचे अतिक्रमण आहे, याचाही खुलासा करावा.

श्री.मुजेब खॉन : कायद्यानुसार महानगरपालिकेच्या जगेवर अतिक्रमण झाल्यास नोटीस देण्याची गरजआहे का याचा विधी सल्लागार यांनी खुलसा करावा.

श्री.नासेर नहदी : आठ ते दहा बैठकीपासून तीच ती चर्चा होते व खुलासाही योग्य प्रकारे होत नाही. निर्मल असोसिएटसच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला होता दहा ते बारा मुद्ये सादर केलेले होते. त्यात महानगरपालिकेची काय चूक आहे हे दाखवून दिलेले होते. अदयाप पर्यत त्याचा खुलासा मिळालेला नाही. नोटीस दिली असे सांगण्यात येते केव्हा दिली केंव्हा मुदत संपणार आहे. त्यापुढे काय ॲक्शन घेतलेली आहे काहीच माहिती दिलेली नाही. नेहमी नेहमी अशीच चर्चा करायची का? या बाबतीत आजच्या बैठकीत खुलासा घेण्यात यावा.

मा.सभापती : निराला बाजर रोडच्या संदर्भात डिफर पेमेंटनुसार हा रस्ता करण्याच्या सुचना महानगरपालिकेकडे आलेल्या आहेत का, किती मीटर रस्ता आहे महानगरपालिके मार्फत आतापर्यत काय कार्यवाही झालेली आहे खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता : महात्माफुले चौक ते सावरकर चौक, निराला बाजर येथील आयलॅण्ड ते नागेश्वरवाडी ब्रीजअसा एकूण दीड किलोमीटर अंतराचे हे दोन रस्ते युरोपीयन धर्तीवर चांगल्या पध्दतीचे बांधण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे. श्री.प्रसाद कुलकर्णी यांची ऑर्किटेक्ट म्हणून नियुक्ती केलेली आहे. तो रस्ता फुटपाथसह बिल्डीग लाईन पासून ते मध्यभागी असलेल्या दुभाजकापर्यत दुतर्फा विकसीत करावयाचा आहे. या रस्त्यासाठी किती खर्च लागेल ती रक्कम काढण्यात येईल. तेथील रहिवासी व व्यापारी यांचेशी संपर्क साधून तेथील असोसिएशन तयार करून त्याचा या कामामध्ये सहभाग घेवून तो रस्ता चांगला सुशोभित करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम अंतीम टप्प्यावर आहे. त्यानंतर स्थायी समितीस या संबधीची माहिती दिली जईल.

मा.सभापती : हे रस्ते चांगले करण्याचे काम हाती घेतलेले आहे. प्रशासनास सुचना देण्यात येतात की, हा रस्ता डी.पी नुसार आहे. भुसंपादीत केलेला रस्ता असून तो रस्ता किती रूंद आहे यासाठी चार दिवसात जगेवर लाल रंगाची मार्कीग करून घेण्यात यावी. जेणे करून तो रस्ता किती रूंद आहे हे संबधीत ऑर्कीटेक यांना समजेल. याची माहिती प्रशासकीय विभागास देण्यात यावी व मार्कीग केल्यानंतर तो रस्ता संपूर्णपणे रहदारीसाठी उपलब्ध असावा. कुणाचेही अतिक्रमण त्या रस्त्यावर दिसणार नाही याची दखल प्रशासकीय विभागाने घ्यावी. पुन्हा या विषयावर चर्चा होणार नाही व माहिती या सभागृहासमोर ठेवावी. तसेच विवेकानंद महाविद्यालया समोरील जगेत जे बांधकाम झालेले आहे ते बांधकाम झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे का? तसेच त्या मालमत्तेला कर आकारण्यात आलेला आहे का व असेल तर केंव्हापासून आकारण्यात आलेला आहे. भोगवटा प्रमाणपत्र कोणत्या तारखेला देण्यात आलेले आहे सर्व खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक (न.र.) : विवेकांनद कॉलेज जवळील जगा महानगरपालिकेची असून सदर कॉलेज पार्कीगसाठी वापरत आहे. कॉलेजसाठी जी परवानगी घेतलेली होती त्या संबधीचा

भोगवटा प्रमाणपत्र अद्याप घेतलेले नाही. ती परवानगी जुनी असून अभिलेख विभागाकडून माहिती घेवून देता येईल.

मा.सभापती : त्या भागाचे काम जे कुणी संबधीत अधिकारी हाताळत असतील यांनी खुलासा करावा. माहिती नसेल तर जेई मार्फत सबंधीत संचिका रेकॉर्ड विभागाकडून मागवून सभागृहासमोर सादर करावी. तसेच प्रशासकीय अधिकारी यांना सुचना देण्यात येतात महानगरपालिकेच्या जगेवर जर कुणी अतिक्रमण केले असेल तर कुठल्याही प्रकारची नोटीस देण्याची आवश्यकता नाही. नियमात जी तरतूद आहे त्याची अमलबजवणी करावी. तसेच तापडीया सर्कल संदर्भातील संचिका असतील त्या मागविण्यात याव्या. या संबधी माहिती असेल तर देण्यात यावी.

सहा.संचालक(न.र) : एम.पी.लॉ कॉलेजच्या परीसरात जे बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तापडीया नाटयमंदीर आहे त्यास ऑडीटोरीयम म्हणून परवानगी देण्यात आलेली होती. शैक्षणिक वापरासाठी म्हणून ऑडीटोरीयम म्हणून भोगवटा प्रमाणपत्र ही दिलेले आहे. या संबधी मागिल स्थायी समितीच्या बैठकीत माहिती देण्यात आलेली होती. त्या लगतच्या उर्वरीत ज्या इमारती आहे अे, बी, सी, डी, एन यांना अद्याप भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. या चार इमारतीच्या ग्राऊंड फ्लोअरला भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. या इमारती रस्त्याच्या दक्षिणेच्या बाजूस येतात आणि पहिल्या मजल्याचे भोगवटा प्रमाणपत्र हे १५ टक्केच्या एफएसआय नुसार बांधकाम आहे. त्यानी काही अटीची पुर्तता केलेली नाही म्हणून देण्यात आलेले नाही.

श्री.अजेजजगीरदार : शैक्षणिक वापरासाठी जगा होती परंतू तेथे दुकाने झाली. वाणिज्य वापर सुरू झाला परवानगी कोणत्या बेसवर देण्यात आलेली आहे. शैक्षणिक वापराच्या आरक्षणातून काढल्यानंतर परवानगी दिलेली आहे का? शैक्षणिक वापरासाठी असतांना वाणिज्य वापर करता येतो का?.

सहा.संचालक(न.र) : शासन निर्णयानुसार त्या संस्थेची जेवढी जगा होती त्याचे १५ टक्के जगेमध्ये वाणिज्य वापर करावा असा शासनाचा जी.आर आहे. त्यानुसार ती बांधकाम परवानगी देण्यात आलेली होती. सुधारीत विकास योजनेत वाणिज्य वापर दाखविलेला आहे.

सौ.लता दलाल : आताच खुलासा केला की तळमजल्यासाठी परवानगी दिलेली होती पहिल्या मजल्याचे भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. एकूण जगेच्या किती टक्के परवानगी दिलेली होती. तसेच १५ टक्के ओपन स्पेस सोडणे आवश्यक होते. उर्वरीत जे बांधकाम झालेले आहे त्यास कोणत्या नियमानुसार परवानगी दिलेली आहे?

श्री. रेणुकादास वैद्य : कोणत्या अटी शर्तीमुळे भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही त्याचाही खुलासा करावा.

सहा.संचालक(न.र) : त्या संस्थेची एकूण जगेच्या १५ टक्के जगा ही वाणिज्य वापरासाठी अनुज्ञेय होती.

सौ.लता दलाल : एकूण जगा किती होती व किती जगेवर परवानगी देण्यात आलेली आहे.

सहा.संचालक(न.र) : आता सध्या निश्चित माहिती माझ्याकडे नाही.

सौ.लता दलाल : १५ टक्के वाणिज्य वापराच्या बांधकामासाठी परवानगी दिली त्याचे मोजमाप कसे केले.

सहा.संचालक(न.र.) : पूर्ण छाननी केलेली आहे. या संबधीचा अभिलेख सध्या माझ्याकडे नाही. एकूण जगेच्या १५ टक्के क्षेत्रात बांधकाम केलेले आहे. बांधकाम परवानगी तळ मजला , पहिला मजल्याची दिली होती तेव्हढेच बांधकाम केले तळ मजल्याचे भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले आहे. पहिल्या मजल्याचे काही अटी शर्ती व समोर ओटेचे जस्तीचे बांधकाम तसेच पार्कींगकडे जणारा रस्ता यामधील अंतर कमी सोडलेले असल्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

श्री.मुजेब खान : गेल्या सहा महिन्यापासून प्रश्न उपस्थित होतात,उत्तर मिळत नाही. मागिल बैठकीत काय चर्चा झाली व इतिवृत्तामधे सुध्दा नमूद असते. परंतु खुलासा मागविला असता आता देवू शकत नाही असे उत्तर मिळते. हे बरोबर नाही. एका प्रश्नाचा एक तर दुसऱ्या प्रश्नाचा रेकॉर्ड नाही असे उत्तर देण्यात येते. आताच प्रश्न उपस्थित केला त्यानुसार एकूण जगा किती आहे १५ टक्के प्रमाणे किती चौ.मीटर बांधकाम येते ही माहिती ठेवणे अधिकाऱ्याचे काम आहे. संबधीत अधिकारी हे साधारण खुलासा करू शकत नसतील तर त्यांना त्यांचे विभागाकडे पाठविण्यात यावे. यापूर्वीही मी मागणी केलेली होती. अधिकाऱ्याच्या हलगर्जेपणामूळे महानगरपालिकेच्या मोठमोठ्या ओपनस्पेस वर मोठमोठी बांधकामे होत आहे. बिल्डर त्याचा फायदा उचलत आहे. जेंव्हा खुलासा होत नाही तेंव्हा या सभागृहाचा अपमान होतो असे आम्ही समजतो. या संबधी मा.आयुक्त,उपआयुक्त व मा.सभापती यांनी त्वरीत संचिका बघून निर्णय घ्यावा.

श्री.गायकवाड दिलीप : नगररचना विभाग तसेच प्रशासकीय विभाग एकाच नाण्याच्या दोन बाजूआहेत. मा.आयुक्त यांनी अनेक कर्मचाऱ्याच्या बदल्या केल्या परंतू श्री. पाठक नावाचे कर्मचारी हे एकाच विभागात २० वर्षापासून काम करतात त्यांची बदली का करण्यात आलेली नाही. या विभागाचे दोन्ही अधिकारी एक दुसऱ्याचे नाव सांगून खुलासा देण्यास टाळाटाळ करतात. हे बरोबर नाही.

मा.सभापती : एम.पी.लॉ कॉलेज तसेच विवेकानंद कॉलेजच्या समोरील दुकानाच्या संदर्भात वारंवार प्रश्न उपस्थित होत आहे. समाधान कारक उत्तर मिळत नाही. सदर दोन्ही संचिका सभापती यांचे दालनामधे दि.२९.१०.२००५ रोजी सादर कराव्यात व सहा.संचालक नगररचना, उपआयुक्त महसूल तसेच उपआयुक्त प्रशासन तसेच ज्या सदस्यांना यासंबधीची अधिक माहिती आहे त्यांनी हजर रहावे. तसेच क्रांतीचौक येथील लीजवर दिलेल्या जगेची संचिका देखिल त्याच दिवशी माझ्या दालनात सादर करावी व या बैठकीला मालमत्ता अधिकारी यांनी सुध्दा उपस्थित रहावे.

श्री. अजीजजगीरदार : एम.पी.लॉ कॉलेज समोरील जे बांधकामास परवानगी देण्यात आली तेंव्हा मा. रेड्डी साहेब हे प्रशासक होते. त्याांनी संचिकेवर असा शेरा दिलेला आहे की, शैक्षणिक वापरासाठीच्या जगेत वाणिज्य वापरासाठी परवानगी देता येत नाही. ती संचिका सादर करावी.

मा.सभापती : एकदा रूलींग दिल्यानंतर त्या विषयावर चर्चा नको, तसेच ज्या या प्रकरणाच्या बाबतीत माहिती असेल ती ती माहिती त्यावेळी मागवून घेता येईल. आपण हजर रहावे.

सौ.लता दलाल : हे बांधकाम होत असतांना ओपनस्पेस सोडलेली नाही. पार्कीगंची जगा सोडलेली नाही त्या संबधी प्रशासनाने आतापर्यत काय कार्यवाही केलेली आहे. ती सुध्दा संचिका मागविण्यात यावी.

मा.सभापती : गुरूवार पर्यत स.सदस्यांचे पत्र येतील त्यानुसार ज्या संचिकेची मागणी करतील त्या सर्व संचिका माझ्या दालनात दि.२९.१०.२००५ रोजी सादर कराव्यात. दुपारी ४.०० वाजता दालनात या संबधीची माहिती घेवू व जी चर्चा होईल त्याचा अहवाल या सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सौ. संगिता जधव : पुडंलीकनगर भागात गल्ली नं. ११ पर्यत पाणी देणार होते का देण्यात आलेले नाही. वार्डातील नागरीक विकासाची कामे करण्याची मागणी करतात. रस्ता नाही तसेच एक महिण्यापासून १० मिनिटे पिण्याचे पाणी येते. श्री. त्रिभूवन नावाचे कर्मचारी पाणी सोडतो तो प्रत्येक घराकडून २० रूपये जमा करतात असे वार्डातील नागरीक सांगतात. पैसे दिले नाही तर पाणी सोडले जत नाही अशी परीस्थिती आहे. अशा कर्मचाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे गेल्या पाच वर्षापासून पैसे जमा करतात. या भागात जलवाहिनीचे काम केव्हा होणार आहे याचा खुलासा करावा. तसेच गुठेंवारीच्या संदर्भात फक्त २०० घरांचाच सर्वे करण्यात येत आहे. कमीत कमी ५०० घरांचा सर्वे करण्यात यावा.

सौ वंदना खंदारे : गादीया विहार भागात पावसाळा असूनही पिण्याच्या पाण्यासाठी नागरीकांना फिरावे लागते व जे थोडयाफार प्रमाणात पाणी येते त्यात ड्रेनेजचे पाणी मिसळत आहे. तसेच वार्डात लाईट बंद असून दिपावली आणि ईदचा सण आहे. लाईट चालू करण्यात यावे. वार्डातील लोकसंख्या ही १८ हजर असून पूर्णपणे वार्डात साफसफाईचे काम होत नाही. कर्मचारी कमी आहे, जस्तीचे कर्मचारी देण्यात यावे.

मा.सभापती : पुडंलिकनगर भागात मी स्वत पाणी पुरवठया संदर्भात पाहणी केलेली आहे. उपअभियंता श्री.कोल्हे हे उपस्थित होते. त्यावेळी या भागात पाणी पुरवठा सुरळित होण्याच्या दृष्टीने सुचना केलेल्या होत्या व असे असतांना त्याची अंमलबजवणी केलेली दिसून येत नाही. संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा तसेच जे कर्मचारी पैसे घेवून पाणी सोडतात त्याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे तसा रिपोर्ट मा.आयुक्त यांचेकडे दयावा मा.आयुक्त कार्यवाही करतील.

कार्य.अभियंता(पापु) : जे कर्मचारी पैसे घेवून पाणी सोडतो या बाबत त्या भागातील नागरीकांशी चर्चा करून माहिती घेवून मा.आयुक्त यांचेकडे अहवाल सादर करण्यात येईल. गल्ली नंबर ११ पर्यंत पाणी पुरवठ्या संदर्भात स.सदस्या सौ. जधव यांना उत्तर दिलेले आहे. गल्ली नंबर ११ व टाकीची पातळी मॅच होत नसल्यामूळे त्यापूढे पाणीपुरवठा करता येत नाही. तसेच गादीया विहार येथील ड्रेनेजच्या पाण्याबाबत आजच पाहणी करून कार्यवाही होईल.

मा.सभापती : जे खुलासा केला तो समाधानकारक वाटत नाही. कारण जी पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे ती तांत्रिक बाबी तपासून टाकलेली असेल. वेगळे कारण न दाखवता दिपावली व ईद हे दोन्ही सण एकत्रित आलेले आहे. सर्वच भागात पाणी मिळेल अशी कार्यवाही करावी व तसे अंदाजपत्रक सादर करण्यात यावे. गुंठेवारीचे कारण दाखवू नये. कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. तसेच जे कर्मचारी पैसे घेवून पाणी सोडतात त्याची चार दिवसात चौकशी करून पत्र पाठविल्याची

माहिती मला कळविण्यात यावी. दिनांक ३.१२.१९९८ रोजीच्या सर्वसाधारण सभेत माजे सैनिकांना मालमत्ता कर व इतर करामधे सूट देण्याचा निर्णय घेतलेला असून आतापर्यत अमलबजवणी करण्यात आलेली नाही. माजे सैनिकांना न्याय मिळाला पाहिजे या भावनेतून सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. या संदर्भात उपआयुक्त प्रशासन यांनी स्वत: जतीने लक्ष घालून अमलबजवणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

श्री.मुजेब खान : माझ्या भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. यापूर्वी संबधीत अधिकारी यांना वारंवार सुचना केलेल्या आहे. असे असतांना सुध्दा रमजनच्या काळात दोन ते तीन दिवस पाणी येत नाही. अधिकाऱ्यांना सुचना केली असता उद्या पाहणी करतो असे म्हटले जते. कोणीही अधिकारी येत नाही. जिन्सीच्या टाकीपासून नेहरूनगर टाकीपर्यत पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे परंतु चालू केलेली नाही. या पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा चालू झाल्यास टंचाई दुर होईल. परंतू कार्यवाही होत नाही. ज्या ज्या भागात पाणी पुरवठा होवू शकत नसेल तेथे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा.

मा.सभापती : ज्या ज्या भागात पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा होवू शकत नसेल काही तांत्रिक अडचणी असतील तर त्वरीत अंदाजपत्रक तयार करून कार्यवाही करावी तो पर्यत पर्यायी व्यवस्था म्हणून त्या भागात अतिरिक्त टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा. कर्मचारी वर्ग कमी असेल तर तशी प्रशासनाने व्यवस्था करावी. किमान संपूर्ण शहरात १५ दिवस म्हणजेच १० तारखेपर्यत पाण्याचा तुटवडा भासणार नाही याची काळजी घेण्यात यावी. स.सदस्य श्री.मुजेब खान यांनी जे पाण्याच्या पाईप लाईनचा प्रश्न उपस्थित केला त्याचा खुलासा करावा तसेच स.सदस्यांच्या माहितीसाठी प्रत्येक वार्डात गुंठेवारीच्या संदर्भात २०० घरांचा अगोदर सर्वे करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. उर्वरीत घरांचा १०० टक्के सर्व्हेचे काम होणार आहे

श्री.मुजेब खान : पाईप लाईन १० वर्षापासून टाकलेली आहे.

कार्य.अभियंता(पा.पू) : आज चार वाजता सदर पाईप लाईनची टेस्टींग करण्याचे काम होणार आहे. त्यानंतर पाणी पुरवठा सुरळीत करण्याची कार्यवाही होईल.

सौ. लता दलाल : महानगरपालिकेत अन्न निरीक्षक पदावर किती कर्मचारी आहेत म्हणून माहिती मागविलेली होती. एकच अन्न निरीक्षक असून त्यांचे नाव राजपत्रात नसल्यामुळे त्यांना अन्न भेसळ प्रतिबधंक कायदा १९५४ व त्याखालील नियमानुसार अन्न नमुने काढणे, न्यायालयीन खटले दाखल करणे ई. कामे करू शकत नाही. असे उत्तरात म्हटले आहे. या शहराची लोकसंख्या ही १० लक्षच्या वर असून एकही अन्न निरीक्षक नाही. शहरात मोठमोठया हॉटेल्स आहेत. जे अन्न नमुने तपासणे किंवा जी फिस घ्यायची ती घेतली जत नाही. जी कार्यवाही करायची ती होत नाही. तसेच एक लक्ष लोकसंख्येला एक अन्न निरीक्षक असणे आवश्यक आहे. म्हणून अन्न निरीक्षकाची पदे भरण्याची त्वरीत कार्यवाही करावी. किमान एक वार्ड कार्यालयासाठी एक अन्न निरीक्षक आजच्या परीस्थितीत असणे आवश्यक आहे.

श्री.दिलीप दाभाडे : सुंदर कन्स्ट्रक्शन या संस्थेने महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे. या संबधी तक्रार केलेली होती. कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आंबेडकरनगर व मिसारवाडी या भागात संबधीत ठेकेदाराने बोगस काम केलेले असून एका

ठिकाणी काम न करता बिल घेतलेले आहे. या संदर्भात चौकशी अधिकारी म्हणून श्री.पानझडे यांना नियुक्त करण्यात आलेले होते. संबधीत ठेकेदार यांना पाठीशी घालण्यात आलेले आहे. या ठेकेदारांनी महानगरपालिकेची फसवणूक केलेली असून त्यांचेवर ४२० चा गुन्हा दाखल करण्यात यावा व घेतलेले बिल वसूल करण्यात यावे. आंदोलन करण्याची वेळ येवू नये.

मा.सभापती : आताच स.सदस्या सौ. दलाल दला यांनी महानगरपालिकेत एकही अन्न निरीक्षक पदावर पात्र कर्मचारी नाही म्हणून म्हटले आहे. आरोग्य अधिकारी यांना सुचना करण्यात येतात की त्यांनी त्यांचे विभागामधे जी जी पदे भरणे आवश्यक आहे त्या संबधी संचिका तयार करावी. एकही अन्न निरीक्षक कार्यरत नसेल तर यापूर्वी प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे याची माहिती देण्यात यावी. तसेच ज्या ज्या विभागात पदे रिक्त आहेत व तेथे कर्मवचारी नाही अशा पदांच्या बाबतीत त्या त्या अधिकाऱ्यानी उपआयुक्त प्रशासन यांचेकडे कळवावे व त्याची माहिती प्रशासनाने माझेकडे दयावी. तसेच स.सदस्यांनी पत्र दिल्यानंतर संबंधीत विभागाकडे एक व स.सदस्यांना उत्तर दिल्याचे एक रजिस्टर नोंदीसाठी ठेवावे. तसेच स.सदस्य श्री. दाभाडे मिलींद यांनी जे मुद्या उपस्थित केला त्या संबधी मा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी व त्यांना तसे लेखी पत्राने खुलासा कळवावा. तसेच प्रशासकीय विभागात आणखी चार कर्मचारी देण्याची व्यवस्था करण्यात यावी. शिक्षण विभागाच्या संदर्भात ज्या शिक्षकांच्या बदल्या संदर्भात समायोजनाच्या बाबतीत अद्याप अंमलबजवणी झालेली नाही, ती करण्यात यावी.

सौ.लता दलाल : शिक्षणाधिकारी यांची मुदत संपलेली असून एक तर त्यांना परत पाठवावे. सर्व कामे ठप्प झालेली आहेत. जून पासून शिक्षकांच्या बदल्या करण्यात आलेल्या नाहीत.

श्री.नासेर नहदी : शहरातील सर्व नाल्याकाठच्या घराचा प्रशासनाने सर्वे केलेला असून १५० ते १७० घरे अनधिकृत असल्याची नोंद आहे. या संदर्भात प्रशासन काय कार्यवाही करणार आहे? तसेच ज्या लोकांनी अनधिकृत प्लॉटींग करून गरीब लोकांना प्लॉट विक्री केले त्यांचेवर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही का करण्यात आलेली नाही. अनेक वेळा या सभागृहात या संदर्भात चर्चा केलेली आहे. तसेच शहरात १० हजर पेक्षाही अधिक अनधिकृत बांधकामे चालू आहे. या संदर्भात प्रशासन काय कार्यवाही करीत आहे.

मा.सभापती : एकूण नाल्या काठच्या १५१३ घरांचा सर्वे झालेला असून वेगळया प्रकारे योजना करावी लागेल व त्यानंतरच कार्यवाही करणे सोयीस्कर होईल. मा.आयुक्त स्व:त कार्यवाही करीत आहेत. गुंठेवारीची अंमलबजवणी करीत असतांना हा प्रश्न सुध्दा मार्गी लागेल असे वाटते. पुढील पावसाळयामधे अशी परीस्थिती निर्माण होणार नाही. ज्यांनी अनधिकृत प्लॉट विक्री केलेले आहे त्यांचेवर कार्यवाही करण्यासाठी तेथील काही नागरीकानी तशी तक्रार दाखल करणे आवश्यक आहे. त्यांना प्रशासन तसेच लोकप्रतिनिधी मदत करतील. विषय क्र.८७ वर चर्चा करण्यात यावी.

**विषय क्र. ८७ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सहकारनगर मुख्य रस्ता, दक्षिण ज्योतीनगर व न्यु एस.बी.एच.कॉलनीतील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण

करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यात ओलेले रक्कम रूपये १०,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणूकादास वैद्य : विषय क्र. ८७ ते ९४ हे सर्व अंदाजपत्रकाचे प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवलेले आहे त्यास मान्यता देण्यात यावी. परंतु याच बरोबर शहरात अजूनही काही महत्वाचे रस्ते आहेत शहरातत चाणक्यपुरी ते गादीया विहार, शहानुरवाडी भागातील रस्ता आहे. पन्नालालनगर ते अमरप्रित हॉटेल पर्यतचा रस्ता त्याच प्रमाणे आयटीआय ते बीड बायपास, पैठण रोड ते कांचनवाडी नाथ सिड्स्चा रस्ता या रस्त्याच्या संदर्भातही जी काही भुसंपादनाची कार्यवाही असेल ती तातडीने करून हे रस्ते सुध्दा तात्काळ विकसित करण्यात यावे.

सौ. संगिता जधव : जळगाव रोड ते मयूरपार्क पर्यतचा रस्ता, तसेच जधववाडी नंदादिप सोसायटी ते न्यु हायस्कूल हर्सूल पर्यतचा रस्ता तसेच सर्वे नं.१९२ जधववाडी ते शिवाजीनगर जयदुर्गा सोसायटी पर्यतचा रस्ता करण्यात यावा. सर्वे नंबर २१९,२९२ मधून डी.पी. रस्त्यासाठी जगा केंव्हा देण्यात येणार आहे खुलासा करावा.

मा.सभापती : या शहरात जवळपास १७ रस्ते हे रहदारीचा प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने करणे गरजेचे आहे. किरकोळ समस्यामुळे या रस्त्याचा विकास होवू शकलेला नाही. मा.आयुक्त यांना सुचना देण्यात येतात की एकूण १७ रस्त्याची यादी सादर करीत आहे. या यादीतील रस्त्याच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक जगेचे भूसंपादन केलेले आहे. काही राहिलेले असतील ते करण्यात यावे. सिडको ते टावून हॉल पर्यत, राममंदीर पासून ते किराडपूरा, रोषणगेट ते चेलीपूरा , चेलीपूरा ते मनपा टाऊन हॉल पर्यतच्या रस्त्यामध्ये माझ्या माहिती प्रमाणे ८ ते १० मालमत्ता भूसंपादनाची कार्यवाही बाकी आहे. इतर भूसंपादनाची कार्यवाही झालेली आहे. मा.जिल्हाधिकारी यांचेकडून तसे पत्रही आलेले आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे काम थांबलेले आहे. या रस्त्याचे काम तात्काळ कसे होईल यासाठी मा.आयुक्तांनी लक्ष घालावे चांगल काम होत आहे हे जनतेला दाखवून देण्याच्या दृष्टीने काम करावे. दिलेल्या यादीनुसार या संपूर्ण रस्त्याचे काम करण्यात यावे डिफर पेमेन्टवर काम करता आले तर तशी कार्यवाही करावी. दमडी महल येथील रस्त्याचे २५ लक्षचे काम करणार आहोत. त्यासाठी सदर जगा ताब्यात घेण्यासंदर्भात मा.आयुक्त यांनी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे तसे प्रयत्न करावे. विषय क्र.८७ ते ९४ मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहकारनगर मुख्य रस्ता, दक्षिण ज्योतीनगर व न्यु एस.बी.एच.कॉलनीतील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात ओलेले रक्कम रूपये १०,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ८८ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.७० मधील जयभवानी कॉलनी, बँक कॉलनी, नंदीग्राम कॉलनी, अलंकार कॉलनी,

स्वप्ननगरी, छत्रपतीनगर, चैतन्यनगर येथे रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यात ओलेले रक्कम रूपये १०,६८,६००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भाग क्र.७० मधील जयभवानी कॉलनी, बँक कॉलनी, नंदीग्राम कॉलनी, अलंकार कॉलनी, स्वप्ननगरी, छत्रपतीनगर, चैतन्यनगर येथे रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात ओलेले रक्कम रूपये १०,६८,६००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिकलठाणा एम.आय.डी.सी.अंतर्गत महाराष्ट्र डिस्टीलरी ते पॉवरलुम वसाहत ते मसनतपूर स्मशानभूमी रस्त्याचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रूपये ११,४९,६५०/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा एम.आय.डी.सी.अंतर्गत महाराष्ट्र डिस्टीलरी ते पॉवरलुम वसाहत ते मसनतपूर स्मशानभूमी रस्त्याचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रूपये ११,४९,६५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९० :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.६४ क्रांतीचौक येथे वर्मा चौक, श्रेयनगर ते देवगिरी बँक व गजनननगर आणि बाबा हरदास नगर येथील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात येईल.

